**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन</u>**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नाव | : | विनोद कमलचंद जैन, |
| वय | : | ३८ वर्षे, |
| धंदा | : | व्यवसाय |
| राहणार | : | वाणी मंगल कार्यालय समोर, शहादा ता. शहादा जि. नंदुरबार. |

(सूचना : तुम्हाला असे सांगण्यात येते की, कोणताही जबाब देण्यास तुम्ही बांधील नाहीत. तुम्हाला असे सांगण्यात येते की, न्यायालयाने विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास तुम्ही बांधील नाहीत. तुम्हाला असे सांगण्यात येते की, कोणत्याही प्रश्नाचे आपण जे उत्तर द्याल ते या खटल्याच्या कामी पुराव्याचा भाग म्हणून विचारात घेतले जाईल. जरी आपण कोणत्याही प्रश्नाची खोटी उत्तरे दिलीत तरी त्याबद्दल आपल्यावर लगेच कोणतीही फौजदारी कारवाई केली जाणार नाही. परंतु आपण दिलेल्या उत्तरांवरून न्यायालय योग्य ते अनुमान काढेल.)

प्र.क्र. १ तुम्ही अभियोग पक्षाचा पुरावा ऐकला काय व तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर. होय

प्र.क्र. २ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ निखील सुर्यकांत कुलकर्णी याच्या साक्षेत असे आले आहे की, ते माहे जुन २०१४ ते मे २०१७ पर्यंत अन्न व औषध प्रशासन, कार्यालय धुळे येथे अन्न सुरक्षा अधिकारी या पदावर कार्यरत होतो. शासनाने त्यांची नियुक्ती केल्याबाबतचे गॅझेट दाखल केले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. ३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, सदर गॅझेटमध्ये अनुक्रमांक १६५ वर त्यांचे नाव आहे. सदर गॅझेट निशाणी क्रमांक २६ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे

12/08/26

प्र.क्र. ४ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून त्यांना काम करण्याचे अधिकार शासनाने प्रदान केले. त्यानुसार ते धुळे कार्यालयात रुजू झाल्यानंतर त्यांना नंदुरबार जिल्हयाचा कार्यभार मिळाला. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. ५ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यांच्यापुर्वी कार्यरत असलेले अन्न सुरक्षा अधिकारी श्री.दिनेश तांबोळी यांचा कार्यभार त्यांना मिळाला. ''श्री.पान सेंटर'' याठिकाणी श्री.तांबोळी यांनी कार्यवाही केल्याबाबतचे दस्तऐवज त्यांना मिळाले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे

प्र.क्र. ६ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन मुंबई यांनी प्रसारीत केलेले नोटीफीकेशन व्दारे महाराष्ट्र राज्यामध्ये गुटखा, पानमसाला व सुंगधी तंबाखू प्रतिबंधीत करण्यात आला होता. ते परिपत्रक निशाणी क्रमांक २७ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे

प्र.क्र. ७ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, अन्न सुरक्षा अधिकारी श्री.दिनेश तांबोळी यांनी शहादा शहरातील ''श्री.पान सेंटर'' याठिकाणी छापा टाकून प्रतिबंधीत पानमसाला व सुंगधी तंबाखू जप्त केले होते. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. ८ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, श्री.दिनेश तांबोळी यांनी सदर मुददेमाल दुकानाचा मालक म्हणजेच तुम्ही आरोपी विनोद जैन यांच्या पासून जप्त केला होता. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. ९ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, सदर मुददेमाल जप्त करतेवेळेस पंच साक्षीदार, पोलिस कर्मचारी व तुम्ही आरोपी यांच्या समोर तपासणी अहवाल तयार केला, त्याची मुळ प्रत त्यांना श्री. तांबोळी यांनी दिली होती. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. १० त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, सदर प्रकरणाबाबत श्री.दिनेश तांबोळी यांनी अन्न सुरक्षा आयुक्त, मुंबई यांच्याकडे सहा. आयुक्त धुळे यांच्या मार्फत न्यायालयात खटला दाखल करण्याच्या परवानगीसाठी प्रस्ताव पाठविला होता. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. ११ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, श्री.दिनेश तांबोळी यांची रत्नागिरी येथे बदली झाल्यामुळे त्यांच्याकडे कार्यभार होता. ते कार्यरत असताना अन्न सुरक्षा आयुक्त, मुंबई यांच्याकडून न्यायालयात खटला दाखल करण्याकरीता मंजुरी आली होती. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे

प्र.क्र. १२ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, सदरचे मंजुरीबाबतचे आदेश व त्याबाबतचे पत्र अनुक्रमे निशाणी क्रमांक २८ व २९ वर आहेत. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे

प्र.क्र. १३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, मंजुरी आदेशानुसार प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तुम्ही आरोपी विरुध्द न्यायालयात लेखी तक्रार दाखल केली. ती निशाणी क्रमांक १ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. १४ अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ दिनेश ज्ञानेश्वर तांबोळी याच्या साक्षेत असे आले आहे की, दिनांक १३/०७/२०१३ रोजी ते अन्न सुरक्षा अधिकारी या

पदावर अन्न व औषध प्रशासन, कार्यालय धुळे येथे कार्यरत होते. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. १५ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, शासनाने त्यांची अन्न सुरक्षा अधिकारी या पदावर नियुक्ती केल्यासंदर्भात गॅझेट नि.क्र. २६ वर आहे. त्यावर अ.क्र. ९९ वर त्यांचे नाव आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. १६ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, अन्न सुरक्षा कायदा सन २००६ प्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार त्यांना मिळालेले आहेत. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १९/०७/२०१२ प्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्ये गुटखा, पानमसाला व सुंगधी तंबाखू एक वर्षाकरिता प्रतिबंधीत करण्यात आला होता. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. १७ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, नि.क्र. २७ वर ते राजपत्र दाखल केलेले आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. १८ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, दिनांक १३/०७/२०१३ रोजी सहा.आयुक्त अन्न व औषध प्रशासन श्री.पाटील यांचे दुरध्वनी संदेशानुसार ते पंच साक्षीदार भुषण पाटील यांच्यासह शहादा पोलीस ठाणे येथे हजर झाले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. १९ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्याठिकाणी अमृत नामदेव पाटील यांना गुप्त माहिती मिळाली होती की, प्रतिबंधीत गुटखा आरोपीच्या दुकानामध्ये साठवलेला आहे. त्यांनी दुकानामध्ये छापा टाकण्याकरिता मदत

करण्याची विनंती केली. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. २० त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते, पंच साक्षीदार भुषण पाटील व सहा.पोलीस कर्मचारी मिळुन श्री. पानसेंटर, जनता चौक, अग्रवाल उपहार समोर, शहादा येथे गेले. सदर ठिकाणी उपस्थित असलेले इसमाचे नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विनोद कमलचंद जैन असे सांगितले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. २१ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यांना त्यांची ओळख करुन दिली व सोबत असलेले पंच साक्षीदार व पोलीसांची ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांनी तुम्ही आरोपीच्या दुकानाची तपासणी केली. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

४०८/८

प्र.क्र. २२ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तुमच्या दुकानामध्ये असलेल्या अन्न पदार्थामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला अन्न पदार्थ विमल प्रिमीयम पानमसाला एकुण ४७ पाकीट प्रत्येकी ७० पाउच असे मिळुन आले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. २३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तसेच केसरयुक्त विमल गुटखा एकुण १४ पाकीट प्रत्येकी ६० पाउच, केसरयुक्त विमल पानमसाला एकुण २८ पाकीट प्रत्येकी ६० पाउच, केसरयुक्त विमल गुटखा एकुण २० पाकीट प्रत्येकी २२ पाउच मिळुन आले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. २४ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तसेच विमल प्रिमीयम पानमसाला एकुण २९ पाकीट प्रत्येकी २० पाउच, विमल सुगंधीत तंबाखु व्ही–१ एकुण

२९ पाकीट प्रत्येकी ६० पाउच मिळुन आले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. २५ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, तसेच विमल सुगंधीत तंबाखु व्ही-१ एकुण १३४ पाकीट प्रत्येकी ३० पाउच मिळुन आले. सर्व प्रतिबंधीत अन्न पदार्थ किंमत १७,६७५/- विक्रीसाठी तुम्ही आरोपीच्या दुकानामध्ये मिळुन आला. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे

प्र.क्र. २६ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यांनी सदर प्रतिबंधीत अन्न पदार्थ कुठुन आणलेले आहे याबाबत विचारणा केल्यावर तुम्ही आरोपीने पुरवठादाराचे नांव सांगितले नाही. तसेच खरेदीचे बिल दिले नाही. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. २७ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, सदर ठिकाणी त्यांनी दुकानाचा तपासणी अहवाल तयार करुन दाखल केला. त्यावर त्यांची, पंच साक्षीदार भुषण पाटील यांची आणि पोलीस कर्मचारी अमृत पाटील यांच्या सहया आहेत. तो नि.क्र.३३ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. २८ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, प्रतिबंधीत मुद्देमाल वापरण्यात येवु नये म्हणुन त्यांनी सर्व मुद्देमाल जप्त केला आणि मेमोरॅन्डम पंचनामा तयार केला. त्यावर त्यांची, पंच साक्षीदार भुषण पाटील यांची, तुम्ही आरोपीची आणि पोलीस कर्मचारी अमृत पाटील यांच्या सहया आहेत. तो नि.क्र.३४ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणे खोटे आहे.

प्र.क्र. २९ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, त्यांनतर त्यांनी पोलीस ठाणे शहादा

येथे जावुन तुम्ही आरोपी विरुध्द तक्रार दिली. त्यांनंतर जप्त केलेला मुद्देमाल नष्ट करण्याकरिता त्यांचे वरिष्ठ अधिकारी बी.यु.पाटील अन्न व औषध प्रशासन सहा.आयुक्त धुळे यांना पत्र दिले. ते पत्र नि.क्र.३५ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. ३० त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, वरिष्ठ अधिकारी यांनी सदर मुद्देमाल नष्ट करण्याचे आदेश दिले. तो आदेश नि.क्र.३६ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. ३१ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, दिनांक ३०/०५/२०१४ रोजी त्यांनी जप्त केलेला सर्व मुद्देमाल नष्ट केला. मुद्देमाल नष्ट केल्याबाबत पंचनामा तयार केला. तो नि.क्र.३७ वर आहे.याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. ३२ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, दिनांक ०२/०८/२०१३ रोजी व ०८/१०/२०१३ रोजी तुम्ही आरोपीला स्वतःची माहिती देण्याकरिता पत्र दिले. ते पत्र नि.क्र.३८ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. ३३ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, दिनांक २१/०५/२०१४ रोजी त्यांनी वरिष्ठ अधिकारी यांना तुम्ही आरोपीविरुध्द तक्रार दाखल करण्याकरिता प्रस्ताव सादर केला. तो प्रस्ताव नि.क्र.३९ वर आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे.

प्र.क्र. ३४ त्याच्या साक्षेत पुढे असे आले आहे की, दिनांक ०६/०६/२०१४ रोजी त्यांची बदली रत्नागिरी येथे झाली. त्यानंतर सर्व कागदपत्र त्यांनी अन्न सुरक्षा अधिकारी कांबळे यांना दिले. त्यानंतर त्यांनी तुम्ही आरोपी विरुध्द

न्यायालयात तक्रार दाखल केली. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ?

उत्तर. हे म्हणणे खोटे आहे

प्र.क्र. ३५ साक्षीदार तुमच्याविरूध्द का सांगतात ?

उत्तर. फसवण्यासाठी

प्र.क्र. ३६ तुम्हाला स्वतःला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे काय किंवा इतर कोणाला साक्षीदार म्हणून तपासावयाचे आहे काय ?

उत्तर. नाही

प्र.क्र. ३७ या प्रकरणाबाबत तुम्हाला आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर. नाही

आरोपीची सही / अंगठा

12/08/26

(दीपक दा. कर्वे)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
शहादा, जि. नंदुरबार.

दिनांक : १२/०८/२०२६

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझ्यासमक्ष नोंदविला असून त्यातील मजकूर हा आरोपीने कथन केल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

12/08/26

दिनांक : १२/०८/२०२६

(दीपक दा. कर्वे)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
शहादा, जि. नंदुरबार